पुढारी MY कोल्हापूर बुधवार, २७ मार्च २०२४

# 'विवेकानंद'मध्ये आजपासून विवेकानंद महोत्सव

कोल्हापूर : विवेकानंद कॉलेजमध्ये 'विवेकानंद महोत्सव : शोध चैतन्याचा' हा विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला वाव देणारा उपक्रम २७ व २८ मार्च दरम्यान होणार आहे. राष्ट्रीय स्तरावरील महोत्सवात विविध महाविद्यालयांतील पदवी व पदव्युत्तर स्तरावरील विद्यार्थी सहभागी होणार आहेत. महोत्सवाचे उद्‌घाटन दि. २७ रोजी श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे यांच्या हस्ते सकाळी १० वाजता होणार आहे. यावेळी संस्था सेक्रेटरी प्राचार्या शुभांगी गावडे, संस्थेचे सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, महोत्सव समन्वयक डॉ. श्रुती जोशी उपस्थित राहणार आहेत. महोत्सवात पहिल्या दिवशी शॉर्ट फिल्म मेकींग, एकपात्री, अभिवाचन, इनोव्हेटीव रिसर्च आयडीयाज अशा विविध स्पर्धा होतील.

27/03/24

27.3.24